लोकमत
नागपूर, मंगळवार, दि. ९ जानेवारी २०२४

# आयपरमध्ये नववर्षानिमित्त रक्तदान शिबिर

लोकमत न्यूज नेटवर्क



वर्धा : औषधी निर्माण शास्त्र शिक्षण व संशोधन संस्था, बोरगाव (मेघे), महाविद्यालयाच्या वतीने नवीन वर्षानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजनेच्या व दत्ता मेघे इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सेस यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते.

यावेळी अतिथी म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र गंजीवाले, आय. डी. पी. चे प्राचार्य डॉ. भूषणकुमार साठे तसेच दत्ता मेघे इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्स येथील रक्त पेढीचे डॉ. बी. एस. पाठक उपस्थित होते. रक्तदान शिबिरात ३६ विद्यार्थ्यांनी रक्तगट तपासून रक्तदान केले. संचालन रा. से. यो, अधिकारी डॉ. नीलेश करंडे व प्रा. आशिष बुधराणी यांनी केले. महाविद्यालयातील कर्मचारी डॉ. एल. जी. राठी, प्रा. जी. डी. दहिकर, प्रा. एस. पी. देवाणी, प्रा. ए. जे. देशमुख, प्रा. एस. पी. गौतम, प्रा. ए. एस. केडिया, प्रा. डी. एम. आवारी, प्रा. राठोड सर, प्रा. मिलिंद भोयर, इत्यादी रक्तदान शिबिरात उपस्थित होते.

लोकमत
epaper.lokmat.com
बुधवार, दि. १४ फेब्रुवारी २०२४

# आयपरची चमू विजेता, तर गो. से. वाणिज्य उपविजेता

## राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन वाद-विवाद स्पर्धा : विजेत्यांना केले सन्मानित

लोकमत न्यूज नेटवर्क

वर्धा : विदर्भ यूथ वेल्फेअर सोसायटी, अमरावतीद्वारा संचालित औषधनिर्माणशास्त्र शिक्षण व संशोधन संस्था, बोरगाव (मेघे) (आयपर) यांच्यावतीने महाविद्यालयात प्रा. राम मेघे स्मृतिप्रित्यर्थ राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वाद-विवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

'भारतातील सामाजिक अखंडतेसाठी समान नागरी संहिता आवश्यक आहे', या विषयावरील स्पर्धेत आयपरचा चमू विजेता, तर गो. से. वाणिज्य महाविद्यालयाचा चमू उपविजेता ठरला. वाद-विवाद स्पर्धेचे उद्घाटन प्राचार्य डॉ. आर. ओ. गंजीवाले यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. भूषणकुमार साठे व वाद-विवाद स्पर्धेचे परीक्षक म्हणून यशवंत महाविद्यालय, सेलूचे डॉ. संदीप काळे व बजाज विज्ञान महाविद्यालयाचे डॉ. सुहास खंडारे मंचावर उपस्थित होते.



डॉ. गंजीवाले यांनी स्पर्धेच्या आयोजनाची भूमिका स्पष्ट केली. या स्पर्धेकरिता राज्यातील १८ चमूंनी सहभाग घेतला होता. यात आयपरची विद्यार्थिनी राधा एस. भावरकर व जेनीस एन. डॅनियल या विजयी ठरल्या. त्यांना फिरता चषक देण्यात आला. गो. से. वाणिज्य महाविद्यालयाची वेदांगी व्ही. कानव व वेदांत एस. रोकडे हे उपविजयी ठरले. त्यांना फिरता चषक व प्रशस्तिपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच वैयक्तिक पारितोषिकामध्ये आयपरची राधा भावरकर हिला प्रथम, गो. से. वाणिज्यची वेदांगी कानव हिला द्वितीय, तर आयपरचीच जेनीस डॅनियल हिला तृतीय पुरस्कार देण्यात आला. या पुरस्कार वितरण समारंभाला राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. तसेच विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. श्यामराव कोरेटी, डॉ. भूषणकुमार साठे व परीक्षक उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. संचालन प्रा. गिरीश दहीकर व प्रा. डॉ. मनीषा पुराणिक यांनी केले. प्रा. जी. डी. दहीकर यांनी आभार मानले.

The Hitavada
Wednesday ■ February 14 ■ 2024

# State-level debate contest held at IPER

■ **District Correspondent**
WARDHA, Feb 13

PROF Ram Meghe Memorial State-Level Inter-Collegiate Debate Competion was organised at Institute of Pharmaccutical Education and Research (IPER), Borgaon (Meghe), Wardha, run by Vidarbha Youth Wellfare Society, Amravati. The topic of debate competion was A Uniform Civil Code is Neccessary.

The guests inaugurated the programme by lighting the traditional lamp. Principal of Institue Prof Dr Sandeep Kale, Yeshwant College, Selu, and Prof Dr Suhas Khandare Bajaj Science College, Wardha, was present on this occasion.

Dr R O Ganjiwale, in his inaugal speech, explained the objectives of organising debate competion. Dr Sanjay Dhudhe, Pro-Vice Chancellor of Rashtrsant Tukdoji Maharaj Nagpur University Nagpur, was present as the chief guest for the prize distribution programme.

Prof Dr Shamrao Koreti, Dean Faculty of of Humanity Rashtrsant Tukdoji Nagpur University, Nagpur, Dr R O Gajiwale, Principal of IPER, Dr Bhushan Kumar Sathe and judges of the debate competition were present on the stage.

Prize were distrubuted to the winning students by dignitaires. Total 18 teams from the various colleges of Maharashtra state participated in the intercollege State debate competion. Dr Sanjay Dhudhe spoke on the importance of Uniform Civil Code to maintain the ssocial integrity.

Prof Shamrao Koreti also guided to the student of the subject of debate.

Prof Dr Sandip Kale and Dr Suhas Kahandare also guided the students.

The winning team of the competition included Radha S Bhawarkar and Jenies Daniel, students of Institute of Pharmaceutical Education and Research, received the trophy and certificate by dignitaries and runner up trophy was won by the students of Govindram Seksaria College of Commerce, Wardha.

The programme was conducted by Girish D Dahikar. Dr Manisha Puranik worked hard for the success of the programme.

लोकमत
epaper.lokmat.com
गुरुवार, दि. १४ मार्च २०२४

# कृतज्ञता सोहळ्यात माजी कुलगुरुंचा सपत्नीक सत्कार



लोकमत न्यूज नेटवर्क

वर्धा : विदर्भ यूथ वेल्फेअर सोसायटी, अमरावतीद्वारा संचलित औषधीनिर्माण शास्त्र शिक्षण व संशोधन संस्था, बोरगाव (मेघे), महाविद्यालयातील माजी विद्यार्थी संघातर्फे राज्यस्तरीय गुणवत्ता हमी सेलचे नवनियुक्त अध्यक्ष तसेच फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाचे उपाध्यक्ष व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगरचे माजी कुलगुरू डॉ. प्रमोद येवले व त्यांच्या पत्नी ज्योती येवले यांचा सत्कार करण्यात आला.

महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित या कृतज्ञता सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी विदर्भ युथ वेल्फेअर सोसायटीचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. कारभारी काळे, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूरचे माजी कुलगुरू डॉ. सिद्धार्थ विनायक काने तसेच विदर्भ युथ वेल्फेअर सोसायटीचे कोषाध्यक्ष डॉ. हेमंत देशमुख, डॉ. भगवान साखळे, दादाजी गहाणे, प्रा. अरुण पाटील, माजी विद्यार्थी डॉ. प्रा. राजेश उगले, शिवाजी शिक्षण संस्थेचे कार्यकारी सचिव डॉ. विजय ठाकरे तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. ओ. गंजीवाले व आयडीपीचे प्राचार्य डॉ. बी. एस. साठे मंचावर उपस्थित होते.

प्रास्ताविक डॉ. आर. ओ. गंजीवाले यांनी केले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी डॉ. प्रमोद येवले यांच्या आतापर्यंतच्या कार्यकाळाला उजाळा दिला. फार्मसी क्षेत्राला त्यांच्यासारख्या व्यक्तीची आवश्यकता असल्याचे मत व्यक्त केले. प्राध्यापक, माजी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले.

## व्यक्तीपेक्षा संस्था नेहमीच मोठी : येवले

आयपर या महाविद्यालयाने मागील २५ वर्षात आपला विकास साधला. या कालावधीत कितीतरी आव्हानांना तोंड द्यावे लागले. कडक प्रशासन व शिस्तीमुळेच या महाविद्यालयाचे नाव राष्ट्रीय पातळीवर नावरूपास आले असून, महाविद्यालय उत्तरोत्तर प्रगती करत आहे. माझ्यासाठी व्यक्तीपेक्षा संस्था मोठी आहे, असे मत डॉ. प्रमोद येवले यांनी व्यक्त केले.

मानपत्राचे वाचन प्राचार्य डॉ. सचिन दिघडे यांनी केले. डॉ. अजय पिसे यांनी डॉ. येवले यांच्या जीवन चरित्रावर चित्रफित दाखवली.

सकाळ
वर्धा, सोमवार, १८ मार्च, २०२४

# माजी कुलगुरू डॉ. प्रमोद येवले यांचा सत्कार

सकाळ वृत्तसेवा

वर्धा, ता. १७ : बोरगाव (मेघे) येथील औषधीनिर्माण शास्त्र शिक्षण व संशोधन संस्था या महाविद्यालयातील माजी विद्यार्थी संघातर्फे राज्यस्तरीय गुणवत्ता हमी सेलचे नवनियुक्त अध्यक्ष तसेच फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाचे उपाध्यक्ष व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. प्रमोद येवले यांचा सपत्नीक सत्कार व कृतज्ञता कार्यक्रम आयोजित करण्यात आला. प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. ओ. गंजीवाले ह्यांनी केले त्यांनी प्रस्ताविकातून कार्यक्रमाची भूमिका व उद्दिष्टे स्पष्ट केली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी अमरावतीचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. कारभारी काळे, माजी कुलगुरू डॉ. सिद्धार्थ विनायक काणे तसेच विदर्भ यूथ वेलफेअर सोसायटीचे कोषाध्यक्ष डॉ. हेमंतराव देशमुख, डॉ. भगवान साखळे, अन्न व औषध प्रशासन सहआयुक्त दादाजी गहाणे, प्रा. अरुण पाटील, माजी विद्यार्थी डॉ. प्रा. राजेश उगले, शिवाजी शिक्षण संस्थेचे कार्यकारी सचिव डॉ. विजय ठाकरे, प्राचार्य डॉ. आर. ओ. गंजीवाले व आयडीपीचे प्राचार्य डॉ. बी. एस. साठे प्रामुख्याने उपस्थित होते.



वर्धा : डॉ. प्रमोद येवले यांचा सत्कार करताना मान्यवर.

डॉ. सिद्धार्थ विनायक काने यांनी डॉ. येवले नागपूर विद्यापीठाचे प्र-कुलगुरू असतानाच्या जुन्या आठवणींना उजाळा दित शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या भरीव कामाची प्रशंसा केली. इतर मान्यवरांसह एस. डी. गांधी, डॉ. शगुफ्ता खान, डॉ. डी. जे. सिंघवी, माजी विद्यार्थी सचिन कपिल, श्रीनिवास निरुकोडा, खुशाल उपासे, प्रा. डॉ. राजेश उगले, डॉ. कुंदन पाटील, क्लीन जयस्वाल आदींनी मनोगत व्यक्त केले. कुलगुरू डॉ. कारभारी काळे यांच्या हस्ते सत्कारमूर्ती डॉ. प्रमोद येवले यांचा सपत्नीक शाल व श्रीफळ, स्मृतिचिन्त्र व मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

मानपत्राचे वाचन प्राचार्य डॉ. सचिन दिघडे यांनी केले. डॉ. येवले यांच्या जीवनचरित्रावर डॉ. अजय पिसे यांनी चित्रफीत सादर केली. सत्कार समारंभाला नागपूर, अमरावती, वर्धा येथील महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, संस्थापक, माजी विद्यार्थी व डॉ. येवले यांचा मित्र परीवार उपस्थित होता. संचालन प्रा. डॉ मनीषा पुराणिक यांनी केले. आभार डॉ. कुंदन पाटील यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. अजय पिसे, प्रा. डॉ. ललित राठी, प्रा. डॉ. नीलेश करंडे, प्रा. अभिराम देशमुख, प्रा. सुनील देवानी, प्रा. साधना गौतम प्रा. मिलिंद भोयर यांनी सहकार्य केले.

लोकमत
गुरुवार, दि. ११ जुलै २०२४

# सायबर क्राइम विषयावर कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क



वर्धा : औषधी निर्माणशास्त्र शिक्षण व संशोधन संस्था बोरगाव (मेघे) येथे सायबर क्राइम विषयावर कार्यशाळा घेण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. ओ. गंजीवाले, प्रमुख वक्ते सायबर सेल विभागाचे पोलिस निरीक्षक पराग पोटे, सहायक पोलिस निरीक्षक मंगेश भोयर, पोलिस उपनिरीक्षक कुलदीप टांकसाळे, पोलिस उपनिरीक्षक सिनूकुमार वाणोत यांची उपस्थिती होती.

प्राचार्य डॉ. आर. ओ. गंजीवाले यांनी प्रास्तविकातून सध्या समाजात घडत असलेल्या घटना सायबर क्राइमच्या घटनांची माहिती दिली. सर्वसामान्य व्यक्तीची कशा प्रकारे फसवणूक होते. फेसबुक, इन्स्टाग्राम, व्हॉट्सॲपपासून सतर्क राहावे, असे आव्हान याप्रसंगी केले. कार्यक्रमाला पराग पोटे यांनी विविध गुन्ह्यांबाबत माहिती दिली. मोबाइल गुन्हे, ऑनलाइन आणि सोशल मीडिया गुन्हे, हॅकिंग, क्रिप्टो करन्सी गुन्हे आणि ऑनलाइन सायबर तस्करी यांसारख्या सायबर गुन्ह्यांबाबत माहिती दिली. संचालन गर्ल्स सिक्युरिटी सेलच्या समन्वयक प्रा. शीतल टिपले यांनी, तर डॉ. ललित राठी यांनी आभार मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

The Hitavada
Saturday August 24 2024

# IPER celebrates Librarian Day

**District Correspondent**
WARDHA, Aug 23

VYWS'S INSTITUTE of Pharmaceutical Education and Research (IPER) in Borgaon (Meghe) Wardha, celebrated National Librarian's Day by organising a special event focused on 'Ethics in Research'.

The occasion also commemorated the birth anniversary of Padmashri Dr S R Ranganathan, widely regarded as the Father of Library Science in India.

In his opening remarks, Dr R O Ganjiwale, Chairman of the Library Advisory Committee and Principal of IPER, emphasised the institute's ongoing academic and clinical research endeavours.

The event's keynote speaker was Dr Swanand S Pathak, Head of the Department of Pharmacology at JNMC Sawangi (Meghe), Wardha.

Dr Pathak's presentation delved into critical aspects of research ethics, including the importance of social and clinical values, scientific validity, fair subject selection, a favourable risk-benefit ratio, respect for both potential and enrolled subjects, independent review processes, and the necessity of informed consent.



Guests with the recepients of 'Best Library User Award' on the dais during the event.

In conjunction with the event, the IPER library department awarded the 'Best Library User Award' for the academic year 2023–2024.

The recipients of this honour were Sakshi C Kakpure (B Pharm IV) and Pranali S Dandekar (B Pharm III).

The programme was skillfully managed by MY Ghogare, Librarian at Institute of Pharmaceutical Education and Research, Wardha, with Anita Karlekar introducing the guest speaker.

The vote of thanks was delivered by Joshi.

Technical support for the event was provided by Milind Bhoyar, Dr M P Puranik, and Dr S A Khan.

A total of 104 participants attended the event, marking it as a significant success.

लोकमत
epaper.lokmat.com
गुरुवार, दि. २६ सप्टेंबर २०२४

# 'आयपर'मधील गणेशोत्सव राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक

लोकमत न्यूज नेटवर्क

**वर्धा :** गणेशोत्सव हा राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक आहे. गणेशोत्सवाच्या माध्यमातून सर्व जाती, धर्म व पंथाचे लोक एकत्रित येऊन काम करण्याची संधी प्राप्त होते. पर्यायाने गणेशोत्सव हा राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक आहे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. राजेंद्र गंजीवाले यांनी केले.

बोरगाव मेघे येथील औषधीनिर्माणशास्त्र शिक्षण व संशोधन संस्थेच्या महाविद्यालयात गणेशोत्सव २०२४ मोठ्या उत्साहात व धार्मिक वातावरणात साजरा झाला. गणेशाची विधिवत स्थापना करून गणेशोत्सव दरम्यान दहा दिवस महाविद्यालयात विद्यार्थी व विद्यार्थिनींनी विविध सांस्कृतिक व क्रीडा स्पर्धेत सहभाग घेतला होता. यामध्ये रांगोळी स्पर्धा, पोस्टर स्पर्धा, नृत्य स्पर्धा वन मिनिट



शो, आनंद मेळावा, आयपर गॉट टैलेंट, व्हॉलिबॉल, तसेच क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. बक्षीस वितरण १७ सप्टेंबर रोजी पार पडले. यावेळी अतिथी डॉ. राजसबाला धांदे, मुख्याध्यापक एस. एम. भस्मे, प्राचार्य डॉ. राजेंद्र गंजीवाले, प्राचार्य डॉ. भूषणकुमार साठे, अंकित केडिया उपस्थित होते. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व ग्रामपंचायतीच्या विद्यमाने पर्यावरण पूरक गणपती व निर्माल्य विसर्जनाची व्यवस्था केली होती. संचालन सौरव काकडे आणि शर्वरी मुळे व आभार दुर्गेश ठाकरे यांनी मानले.

TheHitavada
NAGPUR ■ Thursday ■ October 17 ■ 2024

# IPER felicitates Dr Pramod Yeole

■ District Correspondent
WARDHA, Oct 16



Dignitaries felicitating Dr Pramod Yeole.

INSTITUTE of Pharmaceutical Education and Research (IPER), Borgaon (Meghe), Wardha felicitated Dr Pramod Yewle, newly appointed Chairman of State-Level Quality Assurance Cell (SLQAC) and Vice Chairman of Pharmacy Council of India and Former Vice Chancellor of Dr Babasaheb Ambedkar Marathwada University, recently.

It may be mentioned that Dr Yeole was honoured with the Lifetime Achievement Award by Association of Pharmaceutical Teachers of India, recently at a national seminar held in Bhubaneswar Odisha.

On this occasion Principal Dr R O Ganjiwale delivered the introductory. In the felicitation ceremony, Prof S D Gandhi, Prof Dr L G Rathi, Prof Dr S A Khan and Prof Dr D J Singhvi expressed their thoughts.

Dr Yeole has contributed significantly to the field of pharmacy for the last 40 years. He has so far received 16 National-level awards and has published 85 research papers in various national and international journals. He has also participated in 24 national and international conferences and has 7 research projects approved. Around 21 students have completed their post graduate degree under his guidance.

Dr Yeole rekindled his old memories of IPER and stated that the college has earned its reputation due to the strict administration and discipline. "For me, the institution is bigger than one individual," expressed Dr Pramod Yeole.

President of the institution Dr Nitin Dhande, Secretary Yuvraj Singh Choudhary, Vice President Adv Uday Deshmukh, Treasurer Dr Hemantrao Deshmukh, Nitin B Hivse (Executive Member), Dr Poonam Y Chaudhary (Executive Member), Pankaj S Deshmukh (Executive Member), Prof Vinay P Gohad (Executive Member), Prof Gajanan P Kale (Executive Member) congratulated Dr Yeole.

All the teaching and-non-teaching staffers attended the programme.

The Hitavada
Friday ■ October 18 ■ 2024

# IPER receives grant of Rs 27.5 lakh from Department of Science and Technology

■ District Correspondent
WARDHA, Oct 17

THE Department of Science and Technology (DST), Government of India, has given grant financial assistance of Rs 27,51,347 to theInstitute of Pharmaceutical Education and Research (IPER), Borgaon (M), Wardha, for the project in life science under theWomen Scientist Scheme-A (WOS-A) Scheme. The DST Department has recommended financial support for three years for the project 'Development and evaluation of phospholipid-based formulations of resveratrol for the treatment of inflammatory bowel diseases'.

This project aims to develop safe profile medicine for the treatment of inflammatory bowel diseases (IBD). Inflammation of the gastrointestinal tract causes IBD, which is a multifactorial disease. The incidence of IBD, especially ulcerative colitis, is increasing in India. In fact, India is projected to have highest burden of the disease across the world and ranks first among Southeast Asian countries in IBD. The funds will be used by the institute in the development of successful formulations for the treatment of this life debilitating disease.



The project will be headed by Dr Rajendra Onkarrappa Ganjiwale (Principal) and mentored by Dr Dilesh Jagdish Singhavi. The principal investigator of the project is Dr Pooja Ganpat Swami. The Department of Science and Technology (DST), Government of India, has introduced the WOS to give women scientists and technologists aged 30 to 50 years an opportunity to return to mainstream science and work as bench-level scientists. The scheme encourages women scientists to conduct research in frontier areas of science and engineering, address societally relevant problems, and engage ininternships and self-employment.

Similarly, the WOS-A aims to create opportunities for women scientists to pursue research in basic or applied sciences in frontier areas of science and engineering by providing them research grants for well-defined R&D project proposals.

IPER expresses gratitude to the DST Department for their financial assistance to the project, whose anticipated outcomes will contribute to research into chronic and progressive diseases like IBD. Such schemes encourage women to contribute their knowledge and skills in the field of science and technology, empowering them with career opportunities.

The Hitavada
NAGPUR ■ Saturday ■ October 19 ■ 2024

## State-level Technical Paper Presentation

# Wardha college wins first prize



Guests present at the programme.

■ District Correspondent
WARDHA, Oct 18

MAHARASHTRA State Board of Technical Education Mumbai, Maharashtra Sponsored Maharashtra State-level Technical Paper Presentation (Pharmacy Group ) 2024-25 was organised by Institution of Diploma in Pharmacy, (Govt Aided) in Wardha.

The programme was inaugurated by Yuvrajsingh Choudhary, Secretary, VYWS Amravati, Dr Manoj Daigavane, Former Joint Director Regional Office, DTE Nagpur, Principal and Chief Coordinator Dr Bhushankumar Sathe and Dr Rajendra Gangiwale, Principal, IPER Wardha. Dr Nitin Dhande, President VYWS, was the chief guest. Yuvraj Singh Choudhary, Secretary, VYWS, appreciated the progress of college. He congratulated principal and staff for conducting the State-level Technical Paper Presentation in college. In all, and 110 students from 55 colleges along with the faculty were prestn. Out of 55 presentations, 41 were scrutinised and 8 were selected for final presentations. Dr Bhushankumar Sathe, Dr Nitin Dumore, Dr Lalit Rathi, Dr Manisha Kitkule, Revati Choudhary, Dr Ajay Pathak, Abhiram Deshmukh, Sunil Dewani, Dr Dilesh Singhavi evaluated the presentations. Dhananjay Joshi, Vice President of Maharashtra State Pharmacy Council, was the chief guest for valedictory programme. The first prize of 15,000 was secured by Institute of Dip In Pharmacy Govt, Aided, Wardha, Second prize of 10,000 was presented to Adv V R Manohar College of Pharmacy, Nagpur. The third prize of 5,000 was received by Chetana Institute of Pharmacy, Wardha. Dr Bhushankumar Sathe Principal, gave the detail report and progress of college. Dhananjay Joshi spoke about schemes run by MSPC for Pharmacists.

लोकमत
epaper.lokmat.com
रविवार, दि. ८ डिसेंबर २०२४



## आयपरमध्ये महापरिनिर्वाण दिन

वर्धा : स्थानिक औषधनिर्माण शाख शिक्षण व संशोधन संस्था बोरगाव (मेघे) महाविद्यालयात भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा स्मृतिदिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाला प्राचार्य डॉ. राजेंद्र गंजीवाले यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करुण श्रद्धांजली देण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित महाविद्यालय व नॅशनल डिजिटल लायब्ररी ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने आभासी प्रश्न मंजूषा आयोजित करण्यात आली. त्यामध्ये महाविद्यालयाच्या सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. कार्यक्रमाला महाविद्यालयातील शिक्षक डॉ. डी.एम. आवारी, डॉ. एन.ए. करंडे, डॉ. जे.एस. वानखेडे, प्रा. ए.एस. केडिया, प्रा. एस.आर. आसोले, प्रा. एस.पी. गौतम, प्रा. एस.डी. टिपले, प्रा. वाय.एस. मुडे व शिक्षकेतर कर्मचारी एस.डी. धारपुरे, व्ही.एम. दहिवलकर, एन.जे. सोनटक्के, जी.पी. जरवरकर, एस.एम. मोहिते, ए.बी. वानखेडे, व्ही.पी. दाते तसेच सर्व विद्यार्थी उपस्थित होते. संचालन सी. ए.ए. कार्लेकर, एम.वाय. घोगरे तर आभार प्रा. टी.एस. अली यांनी केले.